महाराष्ट्र शासन

E-mail: deskf10.rfd-mh@gov.in

क्र.एफएलडी-२०२२/प्र.क्र.३३३/फ-१०
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १०.०१.२०२३

प्रति,

अपर मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर
मुख्य वनसंरक्षक (प्रा.), यवतमाळ

विषय:- मे.रिलायन्स जिओ इन्फोकॉम लि. नागपूर यांना जोडमोहा ते नांझा, पोटगव्हाण, डोंगरखर्डा (प्रजिमा-१८), या रस्त्याच्या कडेने ऑप्टिकल फायबर केबल टाकण्यासाठी यवतमाळ जिल्ह्यातील ०.०३९ हे. वनजमीन वळती करणेबाबत.

संदर्भ:- केंद्रस्थ अधिकारी यांचे पत्र क्र. कक्ष-१७/नोडल/यवतमाळ/ID-१२९७७/१९९३/२०२२-२३, दि. ०९.११.२०२२.

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये मे.रिलायन्स जिओ इन्फोकॉम लि. नागपूर यांना जोडमोहा ते नांझा, पोटगव्हाण, डोंगरखर्डा (प्रजिमा-१८), या रस्त्याच्या कडेने ऑप्टिकल फायबर केबल टाकण्यासाठी यवतमाळ जिल्ह्यातील ०.०३९ हे. वनजमीन वळतीकरणाचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने खालील मुद्यांसंदर्भात अधिक माहिती शासनास सादर करावी:-

(१) उपवनसंरक्षक यांनी स्थळ पाहणी अहवालामध्ये सदर प्रकरणी वनभंग झाला असल्याचे नमूद केले आहे. मात्र, प्रमाणपत्रामध्ये वनभंग झाला नसल्याचे प्रमाणित केले आहे. तसेच, केंद्रस्थ अधिकारी यांनी वनभंग झाला नसल्याबाबत नमूद केले आहे. सबब, प्रस्तुत प्रकरणी वनभंग झाला आहे किंवा कसे ? याबाबत अधिक स्पष्टता करावी.

(२) केंद्रस्थ अधिकारी यांनी वळतीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या मौजे नांझा येथील ०.००९ हे. जमिनीचा वैधानिक दर्जा “राखीव वने” नमूद केला असून, उपवनसंरक्षक यांनी ऑनलाईन पार्ट-२ मध्ये सदर जमिनीचा वैधानिक दर्जा “अवर्गीकृत वने (Unclassed Forests)” नमूद केला आहे. त्यामुळे सदर वनजमिनीचा वैधानिक दर्जा “राखीव वने” आहे की “अवर्गीकृत वने” (Unclassed Forests) याबाबत माहिती सादर करावी

(३) प्रस्तावामध्ये ऑप्टीकल फायबर केबल टाकण्यासाठी मौजे. देवनाळा येथील कंपा क्र. ३७० मधील जमिन वळतीकरणासाठी प्रस्तावित केलेली आहे. परंतु, KML File चे अवलोकन केले असता, वळतीकरणासाठी प्रस्तावित केलेले क्षेत्र मौजे. देवनाळा येथील कंपा क्र. ३७० व ३७३ मधील असल्याचे दिसून येते. तसेच, KML File व नकाशा मध्ये

वळतीकरणाच्या क्षेत्राच्या Longitude-Latitude मध्ये तफावत दिसून येते. सबब, KML File व नकाशा आवश्यक त्या सुधारणेसह सादर करणे आवश्यक आहे.

(गणेश जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी :-
उपवनसंरक्षक, यवतमाळ